महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ संवर्गातील अधिकाऱ्यांची दिनांक ०१.०१.१९९९ रोजीची अंतिम ज्येष्ठता सूची...

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांकः ज्येसूची-२६१६/प्र.क्र.१३९/सेवा-२
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, संकुल इमारत, १० वा मजला
मंत्रालय, मुंबई-०० ००१
तारीख: ०३ मे, २०१८

वाचा

१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन परिपत्रक क्र. ज्येसूची-२६१६/प्र.क्र.१३९/सेवा-२, दि. २५.०४.२०१६
२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन परिपत्रक क्र. ज्येसूची-२६१६/प्र.क्र.१३९/सेवा-२, दि. ०४.०१.२०१७
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन परिपत्रक क्र. ज्येसूची-२६१६/प्र.क्र.१३९/सेवा-२, दि. २९.०७.२०१७
४) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे रिट याचिका क. २१४४/२०१८ मधील दि. ०५.०३.२०१८ चे आदेश

शासन शुध्दीपत्रक:-

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ या संवर्गातील अधिकाऱ्यांची दिनांक १ जानेवारी, १९९९ रोजीची अंतरिम ज्येष्ठतसूची संदर्भ क्र. १ च्या शासन परिपत्रकान्वये प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच अंतिम ज्येष्ठतसूची संदर्भ क्र. २ च्या शासन परिपत्रकान्वये प्रसिध्द करण्यात आली आहे. तथापि, डॉ. (श्रीमती) रत्ना दिनकर रावखंडे व डॉ. यु. बी. नावाडे यांनी त्यांचा पूवीच्या विशेषज्ञ संवर्गातील नियुक्तीचा दिनांक ग्राहय धरुन जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गात ज्येष्ठता निश्चित करण्याबाबत अनुक्रमे मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई व मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर येथे मुळ अर्ज क्र. ७४६/२०१४ व ११७/२०१७ दाखल केले होते. सदर मुळ अर्जा प्रकरणी मा. न्यायाधिकरणाने दि. ०८.०७.२०१६ व दि. ०५.०५.२०१७ रोजी आदेश पारित केले आहेत.

जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ या संवर्गातील अधिकाऱ्यांची दि. ०१.०१.१९९९ रोजीची अंतरिम सामाईक ज्येष्ठतासूची दि. २५.०४.२०१६ रोजी प्रसिध्द करण्यात

आली. सदर ज्येष्ठता सूचीमध्ये डॉ. रत्ना रावखंडे यांचा जिल्हा शल्यचिकितसक संवर्गात हजर झाल्याचा दिनांक (दि. ०९.१०.१९९६) विचारात घेऊन त्यांची ज्येष्ठता अनुक्रमांक २७५ येथे निश्चित करण्यात आली होती. डॉ. (श्रीमती) रत्ना रावखंडे यांनी त्यांचा पूर्वीच्या विशेषज्ञ संवर्गातील नियुक्तीचा दिनांक ग्राहय धरुन जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गात ज्येष्ठता निश्चित करण्याबाबत मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मुळ अर्ज क्र. ७४६/२०१४ दाखल केला होता. त्यावर मा. न्यायाधिकरणाने दि. ०८.०७.२०१६ च्या आदेशानुसार डॉ. रत्ना रावखंडे यांची पूर्वीच्या विशेषज्ञ संवर्गातील सेवा जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गातील ज्येष्ठतेसाठी ग्राहय धरण्याबाबत आदेश दिले होते. त्यानुसार मा. न्यायाधिकरणाच्या सदर आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालयात दाखल करावयाच्या अपिलावरील निर्णयाच्या अधीन राहून डॉ. रत्ना रावखंडे यांचा शासन सेवेतील विशेषज्ञ संवर्गातील नियुक्तीचा दि. ०१.०१.१९९१ ज्येष्ठतेसाठी ग्राहय धरुन त्यांची ज्येष्ठता अंतिम सामाईक ज्येष्ठता सूचीमध्ये अ.क्र. १०४ वर दर्शविण्यात आली.

तसेच डॉ. यु. बी. नावाडे यांनी दि. ०४.०१.२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या अंतीम सामाईक ज्येष्ठतासूची मध्ये, त्यांचा विशेषज्ञ संवर्गात रुजू झाल्याचा दिनांक विचारात घेऊन ज्येष्ठता निश्चित करण्याच्या मागणीसाठी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई खंडपिठ नागपूर येथे मुळ अर्ज क्र. ११५/२०१७ दाखल केला होता. सदर प्रकरणी मा. न्यायाधिकरणाने दि. ०५.०५.२०१७ रोजी च्या आदेशान्वये डॉ. रावखंडे यांचे प्रकरणी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई यांनी मुळ अर्ज क्र. ७४३/२९१४ मध्ये दिलेल्या आदेशाच्या आधारे विचार करण्याबाबत आदेशित केले होते. त्यानुसार डॉ. नावाडे यांचा विशेषज्ञ संवर्गातील रुजू झाल्याचा ०१.०४.१९९५ हा दिनांक विचारात घेऊन त्यांचा ज्येष्ठता क्रमांक डॉ. सुभाष तुकाराम पोतदार यांच्या नंतर व डॉ. जगन्नाथ श्रीनिवास कुलकर्णी यांच्या आधी (२३४-अ) शासन परिपत्रक दि. २९.०७.२०१७ अन्वये मा. न्यायाधिकरणाच्या दि. ०५.०५.२०१७ च्या आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालयात दाखल करावयाच्या अपिलावरील निर्णयाच्या अधीन राहून निश्चित करण्यात आली आहे.

तथापि, डॉ.(श्रीमती) रत्ना रावखंडे यांचे प्रकरणी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दि. ०८.०७.२०१६ रोजी दिलेल्या निर्णया विरुध्द शासनातर्फे मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. २१४४/२०१८ दाखल करण्यात आली होती. सदर रिट याचिका प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि. ०५.०३.२०१८ रोजी निर्णय दिला असून, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दि. ०८.०७.२०१६ रोजी दिलेले आदेश रद्द केले आहेत. त्यानुसार डॉ.(श्रीमती) रत्ना रावखंडे व डॉ. नावाडे यांची ज्येष्ठता सुधारीत करणे आवश्यक आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या दि. ०५.०३.२०१८ च्या आदेशास अनुसरुन डॉ. (श्रीमती) रत्ना रावखडे यांची अंतिम सामाईक ज्येष्ठतासूची मध्ये विशेषज्ञ संवर्गातील नियुक्ती विचारात घेऊन अनुक्रमांक १०४ येथे दर्शविण्यात आलेली ज्येष्ठता रद्द करुन त्यांची जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गातील प्रत्यक्ष नियुक्तीच्या दिनांकापासून (दि. ०९.१०.१९९६) विचारात घेऊन डॉ. के. डी. पाखरे यांच्या नंतर व डॉ. जी. यु. पोलावार यांचे आधी अनुक्रमांक २७५-अ येथे ज्येष्ठता निश्चित करण्यात येत आहे. तसेच डॉ. यु.

बी. नावाडे यांचा विशेषज्ञ संवर्गातील रुजू झाल्याचा ०१.०४.१९९५ हा दिनांक विचारात घेऊन त्यांचा ज्येष्ठता क्रमांक डॉ. सुभाष तुकाराम पोतदार यांच्या नंतर व डॉ. जगन्नाथ श्रीनिवास कुलकर्णी यांच्या आधी अनुक्रमांक २३४-अ येथे शासन परिपत्रक दि. २९.७.२०१७ अन्वये निश्चित करण्यात आलेली ज्येष्ठता रद्द करुन त्यांची जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गातील प्रत्यक्ष नियुक्तीच्या दिनांकापासून (दि. १९.५.१९९७) विचारात घेऊन अनुक्रमांक ३४५ वर निश्चित करण्यात येत आहे.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५०३११३७०३१६१७ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vishnudas Pundlikrao Ghodke

Digitally signed by Vishnudas Pundlikrao Ghodke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=514c2e5ad6ac71c69b99a86a5fe5189556b7a95d5896bbb81496f403bb58ac3e, cn=Vishnudas Pundlikrao Ghodke
Date: 2018.05.03 13:05:35 +05'30'

(वि. पुं. घोडके
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
३. सर्व अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा
४. सह संचालक, आरोग्य सेवा (अ. व प्र.) मुंबई
५. सर्व सहसंचालक, आरोग्य सेवा
६. सर्व उप संचालक, आरोग्य सेवा
७. सर्व जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय
८. सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद
९. सर्व वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी (विशेषज्ञ संवर्ग, गट-अ)
१०. संबंधित अधिकारी (व्दारा संचालक, आरोग्य सेवा, मुंबई)
११. मा. मंत्री(सा.आ.)/मा. राज्यमंत्री (सा.आ.) यांचे स्वीय सहायक
१२. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचे स्विय सहायक
१३. निवडनस्ती सेवा-२